

# जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. ८ ) प्रतिनिधी - महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती श्री. जिष्णु देव वर्मा व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांची राजभवन येथे ६ मे रोजी विशेष संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल महोदयांनी विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसोबतच आदिवासी अकादमीचे उपक्रम, सिलेज प्रकल्पाचे कामकाज, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, भारतीय ज्ञान परंपरा कक्षाद्वारे सुरू असलेले कार्य, संशोधन प्रकल्पांचा निधी, रोजगार मेळावे, स्थानिक रोजगार निर्मिती उपक्रम, क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांची कामगिरी यांचे विशेष कौतुक केले.

या बैठकीला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, संयुक्त सचिव श्री. रामामुर्ती व विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष संचालक प्रा. समीर नारखेडे उपस्थित होते. या बैठकीत कुलगुरू प्रा व्ही एल माहेश्वरी यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा संपूर्ण आढाव्याचे सादरीकरण केले.

राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा यांनी चिकित्सेने विद्यापीठाच्या कामगिरीचा व उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षणासोबतच विविध सांस्कृतिक, क्रीडा, लोककला आणि कौशल्याधारित उपक्रमांचे आयोजन विद्यापीठाने करावे, अशा सूचना दिल्या. विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केवळ शैक्षणिक अभ्यासक्रम पुरेसा नसून व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकी दरम्यान विद्यापीठात नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 (NEP 2020) ची अंमलबजावणी पूर्णत्वाची व नव्या सुरु केलेल्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. तसेच विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, संशोधनवाढीसाठी घेतलेली पावले आणि विद्यापीठातील विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांविषयी चर्चा झाली.

यावेळी राज्यपालांनी विद्यापीठाच्या आदिवासी विकासासंदर्भातील कामांचे विशेष कौतुक करतांना विद्यापीठाने आदिवासी अकादमीच्या माध्यमातून आदिवासी मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू असल्याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच लोककला, सांस्कृतिक जतन आणि पारंपरिक कौशल्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रमही उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी केवळ शिक्षण नव्हे तर त्यांच्या उपजीविकेच्या प्रश्नांवरही विद्यापीठाने अभ्यास करून स्थानिक रोजगार उपलब्धतेसह ठोस योजना तयार कराव्यात, असे निर्देश राज्यपालांनी दिले. रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि स्थानिक संसाधनांवर आधारित उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यासाठी संशोधन व नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी विद्यापीठाच्या "सिलेज प्रोजेक्ट"चेही राज्यपालांनी कौतुक केले. ग्रामीण व आदिवासी भागातील शाश्वत विकासासाठी अशा नाविन्यपूर्ण प्रकल्पांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीत कुलगुरूंनी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या रिक्त संख्येबाबत राज्यपाल महोदयांना माहिती दिली. तसेच रिक्त जागी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या कंत्राटी, दैनिक वेतनिक या कर्मचाऱ्यांवरील खर्चाची माहिती देऊन या खर्चामुळे विद्यापीठ फंडावर अतिरिक्त ताण येत असून संदर्भात विकासाच्या योजना राबवतांना त्यावर परिणाम होत असल्याचे सांगितले व रिक्त पदे भरण्यासंदर्भात विनंती केली.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ८ मे, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता